# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.२१/०४/२०२२

**प्रेसनोट**

आज दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय", नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र वसई अंतर्गत "**श्रद्धानंद महिला वृद्धाश्रम**", कोळीवाडा, वसई (प.) येथे मा.आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनानुसार वृद्ध महिलांकरिता **मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे** आयोजन करण्यात आले.

सदर शिबिरास महानगरपालिकेचे उप-आयुक्त मा.डॉ.विजयकुमार द्वासे, मुख्य वैद्यकीय अधिकारी भक्ती चौधरी, तसेच वृद्धाश्रम संचालक मंडळ सदस्य मा.संतोष वळईकर हे उपस्थित होते.

सदर शिबिरात डॉ.आल्हाद राऊत (अस्थिरोग तज्ञ), डॉ.ओशन डिसुजा (शल्यरोग तज्ञ), डॉ.चेतन घरत (इ एन टी तज्ञ), डॉ.राणी बदलानी (फिजिशियन), डॉ.भावेश शर्मा (दंतरोग तज्ञ), डॉ.सौरभ चौधरी (नेत्ररोग तज्ञ), डॉ.वरुण शिरीषकर (स्त्रीरोग तज्ञ), तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.उमेश घाटे, डॉ.मिलिंद जाधव, डॉ.वसंत पाटील व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील कर्मचारी यांचेमार्फत वृद्धाश्रमातील **५० वृद्ध महिलांची** मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर शिबिरांतर्गत Blood Test (CBC, LFT, KFT, RBS, Thyroid Function Test, lipid profile), ECG, Bone Mineral Density Test, Inj.T.T, BP Monitoring इ. तपासणी करण्यात आल्या. त्याचप्रमाणे संबंधितांना ब्लड प्रेशर, मधुमेह व इतर औषधांचे मोफत वाटपही करण्यात आले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**